# संत बहिणाबाई आणि त्यांचे हिंदी अभंग

# Saint Bahinabai and her Hindi Abhangas

डॉ. सौ. वीरा मांडवकर

सहायक प्राध्यापक, इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ

इ मेल : veeramandavkar18@gmail.com भ्रमणध्वनी ९४०३०१४८८५

## गोषवारा

आद्य कवयित्री महदंबेपासून संत बहिणाबाईपर्यंत अनेक स्त्रीसंत होऊन गेल्या. संत बहिणाबाईंचे अभंग म्हणजे तत्कालीन स्त्रीजीवनाचा आरसा आहे. अनेक समर्पक दृष्टांतांद्वारे बहिणाबाई पटवून देतात की, जे पुण्यवान असतात त्यांच्याच पोटी भगवान श्रीकृष्ण जन्म घेतात. बहिणाबाईंनी केलेली हिंदी रचना अत्यंत शुद्ध स्वरूपात आणि समर्थपणे केलेली दिसून येते. मराठीप्रमाणेच हिंदीवरही त्यांचे प्रभुत्व असल्याचे जाणवते. त्यांच्या 22 हिंदी रचना आज उपलब्ध आहेत.

## Abstract:

From the first Marathi poet Mahadamba to Saint Bahinabai, many women became saint poetess. Abhanga of Sant Bahinabai is the mirror of women's life of that time. Bahinabai convinces through many relevant parables that Lord Krishna is born in the womb of those who are virtuous. Bahinabai's Hindi composition appears to be very pure and competently done. She seems to have mastered Hindi as well as Marathi. 22 of her Hindi compositions are available today.

बीजशब्द : संतपरंपरा, परमार्थ, प्रपंच, अभंग, भक्ती, रचना, श्रीकृष्ण

## प्रस्तावना :

'संतकृपा जाली । ईमारत फळा आली ।।१।।  
ज्ञानदेवे घातला पाया । उभारिले देवालया ।।२।।  
नामा तयाचा किंकर । तेणे रचिले आवार ।।३।।  
जनार्दन येकनाथ । खांब दिल्हा भागवत ।।४।।  
तुका जालासे कळस । भजन करा सावकास ।।५।।  
बहेणि फडकती ध्वजा । निरोपण केले वोजा ।।६।।'

('संत बहेणाबाईंचा गाथा' अभंग क्र. १४३)

या ओळींतून संतपरंपरेचा लेखाजोखा ज्यांनी मराठी सारस्वतात अजरामर केला, त्या संत बहिणाबाईंचा परिचय कितीजणांना आहे? रंगाच्या काही फटकाऱ्यांनी एखादा कुशल चित्रकार संपूर्ण विश्व आपल्या नजरेपुढे उभे करतो, तद्वतच वारकरी संप्रदायाचा इतिहास मोजक्या शब्दांतून आपल्यापुढे मांडणाऱ्या संत बहिणाबाई. शब्द परिचित; पण कर्ता अपरिचित, कर्ता काहीसा परिचित; पण कर्त्याचे कर्तृत्व अपरिचित. अशी शोकांतिका ज्यांच्या वाट्यला आली, असे दुर्लक्षित व्यक्तिमत्त्व म्हणजे संत बहिणाबाई. 'ज्ञानदेवे रचिला पाया । तुका झालासे कळस ।।' या दोन ओळींनी तर गेली तीनशे वर्षे मराठी वाङ्मयाच्या पानापानांवर, वक्त्यांच्या ओठाओठांवर अधिराज्य केलेले आहे. संत बहिणाबाई एक स्त्रीसंत; पण तरीही वाङ्मयीन संशोधनाच्या क्षेत्रात त्यांच्या पदरी उपेक्षाच आल्याचे जाणवते.

## संत वाङ्मय :

संत तुकारामांच्या एकमेव स्त्रीशिष्या संत बहिणाबाई यांच्यावर तुकोबांची साक्षात कृपा झाली. प्रपंचात राहूनही परमार्थ साधण्याची त्यांची कला. ओज, माधुर्य, विचारसौंदर्य, वाक्चातुर्य अशा अनेक गुणांनी परिपूर्ण असे त्यांचे वाङ्मय. तरीही हे वाङ्मय संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकारामांच्या साहित्याप्रमाणे जगाच्या कानाकोपऱ्यात पोचू शकले नाही.

बहिणाबाईंचे अभंग म्हणजे तत्कालीन स्त्रीजीवनाचा आरसा. वयाच्या तिसऱ्या वर्षी बिजवराशी झालेला विवाह, त्याच्यासोबतच परागंदा होऊन करावी लागलेली भटकंती, तामसी नवऱ्याने केलेला छळ अशा संकटांमुळे गाईवासरांत रमून

जात, जीवनाची दिशा शोधत निघालेल्या बहिणाबाईंना आध्यात्मिक उन्नतीचा मार्ग दाखविला, तो जयरामस्वामींनी. स्वप्नामध्ये संत तुकारामांचा अनुग्रह प्राप्त झाला आणि त्यांचे जीवन पूर्णत: बदलून गेले. त्यांचे संघर्षमय जीवन त्यांच्या अभंगांतून आर्ततेने उतरले. जीवनातील स्थित्यंतराचा भावनोत्कट शब्दबद्ध आविष्कार म्हणजे त्यांचे अभंग.

वास्तविक पाहता समग्र संतवाङ्मय हे मराठी साहित्याचे केवळ आभुषणच नाही, तर भारतीय संस्कृतीला लाभलेले मोठे वरदान आहे. भक्ती हाच या संतसाहित्याचा स्थायी भाव आहे. 'संत म्हणजे लोककल्याणाची जबाबदारी मनी बाळगून कर्तव्यदक्षतेने वर्तणारे थोर महात्मे. जनतेला आत्म्याची ओळख करून देऊन त्यांच्यात आदर्श जीवनमूल्ये ठेवून तदनुसार जगण्याची स्वतंत्र अशी जीवननिष्ठा त्यांना प्राप्त करून देणे, ही संतांनी आपली सामाजिक जबाबदारी मानली होती. नानाविध मतमतांच्या वादळात सापडलेल्या, स्वहिताचे भान हरवून बसलेल्या व हतबुद्ध झालेल्या समाजाला त्यांनी डोळस भक्तीचा मार्ग दाखविला.'[१] 'चक्रधरांनी पुरस्कारलेली अहिंसा आणि निवृत्तिनाथांनी शिकवलेला आदर्शवाद या वारसाबळावर तेराव्या शतकातील मराठी वाङ्मय पोसले गेले व त्यातून विवेकनिष्ठ भक्तिमार्गाच्या खळखळत्या प्रवाहाने साहित्यगंगा वाहती झाली.'[२]

महाराष्ट्राच्या जडणघडणीत या संतांचा मोठा सहभाग आहे. तेराव्या शतकापासून आजपर्यंत महाराष्ट्राला संतांची वाण पडली नाही. त्यात स्त्रीसंतांचाही मोठा वाटा आहे. आद्य कवयित्री महदंबेपासून संत बहिणाबाईपर्यंत अनेक स्त्रीसंत होऊन गेल्या.

## बहिणाबाईंचे हिंदी अभंग :

बहिणाबाईंच्या कालखंडात दक्षिणेत अशांतीचे साम्राज्य होते. बहामनी आणि मोगल यांच्यात सतत संघर्ष सुरू होता. बहिणाबाईंच्या प्रांतावर तेव्हा दिल्लीच्या मुघल बादशहाच्या सुभेदाराचे राज्य होते. दिल्लीस इ.स. १६२८ ते १६५८ पर्यंत शहाजहान व त्यानंतर इ.स. १६५८ ते १७०७ पर्यंत औरंगजेबाचे राज्य होते. औरंगजेब दख्खनचा सुभेदार म्हणून प्रथम इ.स. १६३६ ते १६४४ व दुसऱ्यांदा इ.स. १६५३ ते १६५८ मध्ये राज्य करीत होता. दुसऱ्या वेळी त्याची नेमणूक झाली तेव्हापासून तो खडकी येथे राहू लागला व खडकीचे नाव बदलवून त्याने औरंगाबाद असे ठेवले. तेव्हापासून मुघलांचे मुख्य लष्करी ठाणे म्हणून औरंगाबादला महत्त्व आले. शिवाजी महाराजांच्या निधनानंतर इ.स. १६८० ते १७०७ पर्यंत पुन्हा औरंगजेब दक्षिणेस येऊन राहिला. औरंगजेब व मराठे तसेच आदिलशहा व कुतुबशहा यांची आपापसात सारखी युद्धे होत होती. अशा परिस्थितीत बहिणाबाईंचा हिंदी भाषेशी संबंध येणे अपरिहार्यच होते. म्हणून त्यांनी हिंदी रचना केल्या, यात आश्चर्य वाटण्याजोगे काही नाही. आश्चर्य वाटते ते याचे की, एक ग्रामीण भागातील स्त्री असूनही त्यांच्या हिंदी रचना शुद्ध स्वरूपात आणि दोषविरहित आहेत.

संत बहिणाबाईंनी रचलेल्या हिंदी पदांची संख्या एकूण २२ आहे, ती पदे खालीलप्रमाणे :—

१. देवकी कहे सुन बात ................ खोलत जावत है अविनाश रे ।। (अ. ३९०)
२. ये गोकुल चल हो कहत मुऱ्हारी ...... मुरारि काहेकु संकट वाके ।। (अ. ३९१)
३. बसुदेवा तब बारन आवे ............ दीन्ही दरबाजे रखे फेरा ।। (अ. ३९२)
४. बसुदेवा जब देखे हरिकू ............ वोही कारण जान ।। (अ. ३९३)
५. जय जय कृष्ण कृपाल भयोजी ........ येही कहो घननीला ।। (अ. ३९४)
६. सुनो कहत है श्याम सुजानो ......... सोवे सबही संपति दास ।। (अ. ३९५)
७. ये गोविंद प्राप्त भयो कहा ............ वो साधूकी संगती ।। (अ. ३९६)
८. ये अजब बात सुनाई भाई ........... वाको साच न मान ।। (अ. ३९७)
९. सब ब्रजनारी सुनो हरि जनमो ....... नारी देहभाव नहीं जाने ।। (अ. ३९८)
१०. कंटक को मल्लमर्द । ............... सत्य सुजानि है ।। (अ. ३९९)
११. जिस आस जोगी जग । ............ बहेणि ये कहत है ।। (अ. ४००)
१२. जमुनाके तट धेनु चरावत । ........ मेरा हरिसुं लगा है मन ।। (अ. ४०१)
१३. मरनसो हक है रे बाबा ............ मरन करे आप दूर ।। (अ. ४०२)
१४. सच्चा साहेब तू येक मेरा ........... तेरे पर बलि जाय ।। (अ. ४०३)
१५. देव करे सो कहाँ न होवे ........... हो जो करे सो सब होई ।। (अ. ४०४)
१६. जटा न कंथा सिंगी न ............. तेरे पर बलि जाऊँ ।। (अ. ६०८ — पद)
१७. दो दिनकी है दुनिया ................ कृष्ण नाम तमे हुसीयार ।। (अ. ६११)
१८. बडा भेख शिर मुंडाया ............. पेटमें वासना भूखी ।। (अ. ६३० — मुंढा)
१९. मुंडा मुंडा सब कहते । ............ तो काहेकू नाडते जग ।। (अ. ६३१ — मुंढा)

२०. नंदजी आसिस भाट .............. बहिनी मूसे गात है । (अ. ६३९ — भाट)
२१. जसोदाका पुण्य फलो .............. पाप जावे बहिनीका जी । (अ. ६४० — भाट)
२२. गुरुने मुझे ग्यानप्याला ............. दील राजी उसीसू ।। (अ. ६६५ — श्लोक)

## बहिणाबाईंच्या हिंदी अभंगांचे विषय :

बहिणाबाईंनी रचलेल्या २२ हिंदी रचनांमध्ये पदे अभंग, भाट, मुंढा इत्यादी प्रकार आढळतात. तेरा पदांमधून बहिणाबाईंनी कृष्णकथा रंगवली आहे. श्रीकृष्णाचा जन्म होताच त्यांनी वसुदेव आणि देवकीला आपले दर्शन चतुर्भुज आणि घनश्याम स्वरूपात दिले. त्यावेळी वसुदेव—देवकीला देवानेच आपल्या पोटी अवतार घेतला याचे आश्चर्य वाटले, असे वर्णन ३९३, ३९४ व ३९६ क्रमांकावर आलेल्या त्यांच्या पदांमधून येते. अनेक समर्पक दृष्टांतांद्वारे बहिणाबाई पटवून देतात की, जे पुण्यवान असतात त्यांच्याच पोटी भगवान श्रीकृष्ण जन्म घेतात. अभंग क्र. ३९७ मध्ये अशक्य गोष्टी निंदकांच्या तोंडून कशा पसरविल्या जातात, ते सोदाहरण बहिणाबाईंनी वर्णिले आहे. जसे, गरुडाचे पंख कावींयाने चोरले, अमृतपानाने मृत्यू झाला, कुबेर धनासाठी रडतो आहे, हनुमानाला पत्नीची आस लागली. अशाप्रकारच्या गोष्टी निंदक पसरवू शकतात, तेव्हा त्यांच्यावर विश्वास ठेवू नये, असे आवाहन त्या करतात.

अभंग क्र. ३९८, ३९९ मध्ये नंदाचे भाग्य किती थोर म्हणून त्याच्या घरी कृष्णजन्म झाला. अनेकांना पुण्याकरिता कितीतरी प्रयत्न करावे लागतात. नंदाला काहीही न करता त्याचे पुण्य इतके अगाध की त्याच्या घरी गोविंद प्रकट झाला.

अभंग क्र. ४०१ मध्ये गोपालकृष्णाचे वर्णन केले आहे. यमुनेच्या तीरावर गाई चारणारा हा गोविंद त्याचे पिवळे वस्त्र, कानात कुंडले, डोक्यावर मोरपीस, सुवासिक हार आणि सुमधुर संगीत अशा सर्गींया गुणांनी युक्त असलेल्याचे मला वेड लागले आहे.

'बहेणि कहे सब भूल गये । मेरा हरिसुं लगा है मन ।।'

बहिणाबाईंची कृष्णाप्रती असलेली ही तन्मयावस्था त्यांचे कृष्णाविषयी असलेले प्रेम व्यक्त करते.

अभंग क्र. ४०२ मध्ये बहिणाबाई एखाद्या तत्त्वज्ञाप्रमाणे मृत्यूवर भाष्य करतात. प्रत्येकाला एक दिवस मृत्यू येणारच आहे, त्यामुळे त्याच्यापासून दूर जाण्याचा प्रयत्न करण्यात अर्थ नाही. ज्ञानी लोक ही गोष्ट समजून घेतात आणि मृत्यूच्या भयाला दूर करतात, असे त्या शेवटी म्हणतात.

अभंग क्र. ४०४ मध्ये बहिणाबाई राममहिमा रंगवून सांगतात. रामाची विविध कर्तृत्वे त्या आपल्यासमोर सुंदर शब्दांत उभी करतात. कृष्णासोबतच रामाबद्दलही असणारा त्यांचा आदर येथे व्यक्त होतो.

६०८ व्या क्रमांकावर आलेल्या पदात बहिणाबाई संतांचे रूपवर्णन व गुणवर्णन करतात. संतांचे राहणीमान, त्यांचे विचार, आचार या सर्गींयांचे विवेचन आहे. अशा या संतांना आपण शरण गेल्याचे त्या सांगतात.

अभंग क्र. ६११ मध्ये जगाचे व जीवनाचे क्षणभंगुरत्व सांगून त्या देवाला शरण जाण्याचा सल्ला देतात. कृष्णाचे नाम तुम्हाला तारून नेईल, असे त्या सांगतात.

अभंग क्र. ६३० व ६३१ यांना 'मुंढा' शीर्षक देऊन त्यांत त्या खोट्या मुंढ्यची म्हणजे संन्याशाची खरडपट्टी काढताना दिसतात. हे खोटे संन्यासी जगाला दाखविण्यासाठी वेगवेगळी सोंगे घेतात व जगाला फसवितात. अशांचा त्या खरपूस शब्दांत समाचार घेताना दिसतात.

अभंग क्र. ६३९ व ६४० यांना बहिणाबाईंनी 'भाट' असे शीर्षक दिले आहे. त्यांत नंदाला आशीर्वाद देऊन कृष्णाचे कौतुक केले आहे. कृष्णाचे पूर्ण वैकुंठज्ञानी असे रूप त्या येथे दर्शवितात.

अभंग क्र. ६६५ म्हणजे श्लोक असून त्यात बहिणाबाई गुरूने ज्ञान दिल्यामुळे माझे अज्ञान दूर पळाले, असे सांगतात.

अशाप्रकारे बहिणाबाई आपल्या हिंदी अभंगांतून विविध विषय समर्थपणे हाताळतात. तसेच मराठी भाषेसोबत हिंदी भाषेवरही असलेले प्रभुत्व येथे दिसून येते. तत्कालीन चालीरीती, भाषा, रूढ संकेत, व्यक्तिचित्रे हे सगळे आपल्या हिंदी अभंगांतून प्रत्यक्ष उभे करण्यात निश्चितच यशस्वी ठरलेल्या आहेत. गोपाळकृष्णाचे वर्णन करताना त्यांच्या वाणीतील प्रासादिकता मोहून घेते. खोट्या गोष्टींचा तिरस्कार, सत्य, सौंदर्य यांचा आदर हे बहिणाबाईंच्या या काव्याचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. भाषेतील विविध अलंकारांचा वापर, प्रसंगी कठोर शब्द, वस्तुस्थितीचे ज्ञान करून देणारी शैली अशा सर्व गुणांनी बहिणाबाईंचे हिंदी अभंग त्यांच्या मराठी अभंगांप्रमाणेच रसिकांना आपलेसे करतात.

तत्कालीन राजकीय व सामाजिक परिस्थितीचा आढावा घेतल्यास आणि सांस्कृतिक पार्श्वभूमी तपासल्यास संतांची हिंदी रचनानिर्मिती साहजिक वाटते. उल्लेखनीय म्हणजे बहिणाबाईंनी केलेली हिंदी रचना अत्यंत शुद्ध स्वरूपात आणि समर्थपणे केलेली दिसून येते.

## निष्कर्ष :

१. 'ज्ञानदेवे रचिला पाया । तुका झालासे कळस ।।' या दोन ओळींनी गेली तीनशे वर्षे मराठी वाङ्मयाच्या पानापानांवर, वक्त्यांच्या ओठाओठांवर अधिराज्य केलेले आहे.

२. बहिणाबाईंचे अभंग म्हणजे तत्कालीन स्त्रीजीवनाचा आरसा आहे.

३.'संत म्हणजे लोककल्याणाची जबाबदारी मनी बाळगून कर्तव्यदक्षतेने वर्तणारे थोर महात्मे आहेत.

४. आद्य कवयित्री महदंबेपासून संत बहिणाबाईंपर्यंत अनेक स्त्रीसंत होऊन गेल्या.

५. अनेक समर्पक दृष्टांतांद्वारे बहिणाबाई पटवून देतात की, जे पुण्यवान असतात त्यांच्याच पोटी भगवान श्रीकृष्ण जन्म घेतात.

६. बहिणाबाईंनी केलेली हिंदी रचना अत्यंत शुद्ध स्वरूपात आणि समर्थपणे केलेली दिसून येते.

## संदर्भ :

१. उषा माधव देशमुख, 'रुजुवात', मराठी साहित्याचे आदिबंध, प्रथमावृत्ती, लोकवाङ्मय गृह प्रा.लि., मुंबई, १९८२, प्रारंभिक पृ. ८.

२. शं. कि. चतुरकर, 'उपोद्‌घात', मराठी संतांचा आध्यात्मिक विचार, प्रथमावृत्ती, पुं.कि. चतुरकर, अमरावती, १९७९, प्रारंभिक पृ. १६.

## संदर्भ ग्रंथ :

१. शं.गो तुळपुळे, महाराष्ट्र सारस्वत (पुरवणी), खंड दुसरा, सहावी आवृत्ती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८३.

२. इंदुमती शेवडे, संत कवयित्री, प्रथमावृत्ती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८९.

३. हे.वि. इनामदार, विलास खोले (संपा.), 'अनंत लावण्याची शोभा', भक्तिगंगेच्या वाटेवर, प्रथमावृत्ती, संजय प्रकाशन, पुणे, १९८८.

४. दिलीप पुरुषोत्तम चित्रे, बहेणी म्हणे हात घाला मस्तकी, प्रथमावृत्ती, भागवत प्रबोधन संस्था, देहू, १९९८.

ΔΔΔΔΔ

Published Details
Sant Bahinabai ani Tyanche Hindi Abhang, Research Journal of India, Dr. Bhau Mandavkar Research Centre, Kalamb, ISSN 2349-9370, Vol. 5, Issue 1, Oct. 2018, pp. 75-78
Available at SSRN: https://ssrn.com/abstract=4287407